

‘सहवास–सदगुरूंचा’

## // श्री गणेशदत्तगुरूभ्योंनमः //

प.पु. श्री वक्रतुंड महाराज कविश्वर विदर्भात येत असताना श्रीक्षेत्र पैठण येथे विद्वत परीषद सुरू होती. अनेक विद्वान शास्त्री पंडीतांची भाषणे संपन्न झाली. श्री महाराजांनी माझीही सरस्वतीची सेवा करण्याची इच्छा आहे, अशी विनंती केली. त्यांची मळकट पंचा व बाराबंदी घातलेली मुर्ति पाहुन, हा कळकट ब्राह्मण काय सेवा करणार असा उपहास तेथील महापंडीतांनी केला. त्यावर काही लोकांनी त्यांची इच्छा असल्यास बोलु द्यावे असे सांगितल्यावर, महाराजांनी तेथे पडलेला व काहीतरी लीखाण असलेला कागद उचलला व प्रवचन करण्यास सुरूवात कोली. त्यांचे विद्वत्ताप्रचूर पुराण ऐकुन मोठमोठ्या पंडीतांनी माना डोलविल्या व आपल्या डोक्यावरील पगड्या उतरविल्या, त्यात हत्तीशास्त्री नावाचे एक विद्वानही होते. हत्ती एवढी त्यांची विद्वत्ता होती म्हणून त्यांना हत्तीशास्त्री अशी पदवी होती.

तेथून श्री महाराज देऊळगावराजा येथे आले. देऊळगावराजा येथे अनेक लोकांनी त्यांचे शिष्यत्व स्वीकारले व अनुग्रह घेतला. त्यात आमचे आजोबा श्री बापुजी तेलंग व आजी सौ. सरस्वतीबाई तेलंग हेही होते. तेव्हापासून आमचे घराण्यात श्री कविश्वरांची गुरूपरंपरा सुरू झाली. नंतर श्री ढुंढीराज महाराजांकडून आमचे काका श्री रामचंद्र, आत्या, आमचे पु. पिताश्री गोपाळराव तेलंग ज्यांना तात्या म्हणून ओळखत व आमच्या मातोश्री सौ. सत्यभामा तेलंग यांनी अनुग्रह घेतला. आमचे माता-पित्यावर त्यांची अतिशय कृपा व प्रेम होते. प.पु.आईसाहेब श्री तात्यांना थोरला मुलगा मानीत. मला 5 मुले आहेत, थोरला गोपाळ नागपुरला असतो मग दत्ता असा त्या उल्लेख करीत.

त्या काळी सासुरवासाचे प्रमाण फार असे. आमच्या मातोश्रीनाही तो होता. त्यांचेकडे महाराजांकडील कपडे धुण्याची सेवा होती. सकाळी नदीवरून कपडे धुवून आणणे व महाराजांचे माडीवर वाळत घालण्याचे काम त्यांचेकडे होते. कपडे वाळत घातल्यावर सौ. आईसाहेब त्यांना काही खाण्यास देत असत. घरी जायला उशीर होईल व सासुबाई रागावतील असे सांगीतल्यावर, त्या म्हणायच्या की, सांग आईसाहेबानी, कबाड्याच्या आडावरून पाणी आणायला सांगीतले म्हणून, ब्राह्मण स्त्रिया ज्या विहीरीवर पाणी भरीत तो कबाड्याचा आड म्हणून ओळखला जात असे. ही सेवा आमचे माता-पिता देऊळगावराजा येथे असे पर्यंत सुरू होती. श्री तात्या वैदीक शिक्षण घेण्यासाठी ब्रम्हगिरीवर गेले असताना एक साधु तेथे आला व 'यहां नहीं रहना, गुरु के पास जाव' म्हणुन अंगावर पाणी फेकु लागला. तेथुन ते नरसोबाच्या वाडीला आले. व गुरूगृही राहुन गुरूची सेवा करून ते वेदशास्त्र संपन्न झाले.

देऊळगावराजा येथे त्यांनी 108 भागवताची पारायणे केली. गावात प्लेगाची साथ असताना सुध्दा ते एकटेच मंदीरात असत. आजुबाजुला उंदीर फीरत पण त्यांच्याजवळ जात नसत. घरी त्यांना बराच त्रास सहन करावा लागे. तेंव्हा श्री ढुंढीराज महाराजांनी त्यांना नागपुर येथे वास्तव्य करावयास सांगीतले व देऊळगावराजाला घरावरील हक्क सोडून दे, तुला आयुष्यात काही कमी पडणार नाही असा आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे आमचे आईवडील नेसल्या वस्त्रानिशि एक तांब्याभांडे घेऊन नागपुरात आले व श्रीदत्तमंदीरात वास्तव्य करून दत्तसेवा करीत राहीले. गुरूकृपेचे फळ काय असते ते गोपाळबुवांकडे बघुन कळते असे श्री ढुंढीराज महाराज इतर शिष्यांना उदाहरण देऊन सांगायचे.

सुमारे 1949-50 साली नरसोबाचे वाडीत आमच्या मातोश्रींचा मुक्काम होता. तेंव्हा त्यांच्या प्रदक्षिणा पुर्ण होईपर्यंत अस्मादिकांना कडेवर घेऊन श्री ढुंढीराज महाराज श्री कृष्णेच्या घाटावर फीरत अशा आमच्या मातोश्री नेहमी कौतुकाने सांगत असत.

1952-53 साली श्री महाराजांचा मुक्काम आमचे येथे श्री टेंबेस्वामींच्या ग्रंथ प्रकाशनासंबंधी झाला व त्यावेळी तात्यांबरोबर श्री महाराज पवनी येथेही गेले होते. त्यावेळी दत्त मंदीरात काही बांधकाम सुरू असताना सामान इकडे-तिकडे ठेवण्यात आमच्या गरोदर मातेस श्री महाराज मदत करीत, असे आमच्या मातोश्री नेहमी सांगायच्या.

श्री दत्त मंदीरात श्री गुळवणी महाराज आपली माता व भगिनी सहीत तीन दिवस मुक्कामाला असल्याचे आमचे वडील सांगत असत. तसेच केडगावचे श्री नारायण महाराजही अनेक वेळेला जेऊन गेल्याचे सांगत.

आमच्या आईला मामी म्हणत. सोवळयात स्वयंपाक व जेवणे असायची. महाराज आपला पाट मामी स्वयंपाक करीत असताना तिच्या जवळ ठेवीत व आम्ही तुमच्याजवळ बसल्यावर तुम्हाला उठून वाढायचा त्रास होणार नाही असे म्हणत.

श्री महाराजांकडून लीखाण्याचे काम करून घेऊन योग्य मोबदला न मिळाल्याचा उल्लेख श्रीं चे चरीत्रात आहे. त्यानंतर महाराज नागपुरात आल्यावर आमचे वडील त्यांना अनेक ठिकाणी घेऊन जात असत. त्यावेळी 50 व्या दशकात श्री महाराजांना 149 रू. मिळाल्याची यादी नाव व कोणी किती रक्कम दिली याची माहीती काही वर्षाआधी पर्यंत माझ्या संग्रही होती. 1961 साली श्रींचा प्रदीर्घ मुक्काम नागपुरात झाला. त्याच मुक्कामात सौ. सुलभाताईंचे श्री माधवराव तांबोळींशी लग्न ठरले. श्री. माधवराव हे आमच्या जेष्ठ भगीनी सौ. रजनीताई यांचे सख्खे मामेदीर आहेत.

नंतर श्री. पुण्यात गेले व सौ. काकु, सुलभाताई श्री अशोक व चि. अजीत यांना नागपुरला पाठविले. सौ. सुलभाताईचा फोटो आमच्याकडे होता बाकी पत्रात खालीलप्रमाणे वर्णन होते.

आम्ही येथुन सौ.व ती, चि. अशोक चि. सुलभा व चि. अजित यांना रेल्वेने नागपुरला पाठवित आहोत. सौ.वतीने चष्मा लावला असून त्यांचेकडेवर लहान मुल असेल. चि. सुलभाचा फोटो तुम्ही बघितलाच आहे व अशोकही बरोबर आहे.

1961 च्या फाल्गुन / चैत्रात महाराज सुरवातीला आले त्यावेळी तात्यांना म्हणाले की तात्या आमच्या मंडळींना आम्ही दोन दागीने करून दिलेत. तात्यांनी कौतुकाने विचारले कोणते दागीने केले. त्यावर महाराज हसले व म्हणाले. डोळ्याला चष्मा व दातांची कवळी.

सौ. सुलभाताई वगैरे मंडळी, दाखविण्याचा कार्यक्रम झाल्यावर पुण्यात परत गेली व पुढील गोष्टी करण्यासाठी महाराज परत नागपुरला आले. लग्न पक्के झाल्यावर त्यांनी तात्यांना सांगीतले की तुमच्या पाच मुली, तशी ही सहावी. हिचे सगळेच तुम्हाला करावयाचे आहे.

लग्नाची तिथि निघाल्यावर महाराज परत पुण्यास गेले सर्व तयारी श्री तात्या व सौ. मामी यांनी केली. तात्यांनी सांगीतले की फक्त कुळाचार, लग्न व मांडव परतणीच्या वेळेलाच या सामानाला हात लावायचा, तोपर्यंत व नंतरचा सर्व खर्च आपला. लग्न आटोपल्यावर उरलेले सर्व सामान परत करून उरलेले पैसे श्री महाराजांना दिले. किती ही गुरु घराण्यावरची निष्ठा. आम्ही त्यांच्या ह्या गुरूवरील निष्ठेचा अनुभव समज आल्यापासून सतत घेतला आहे. लग्न उत्तम प्रकारे व थाटात पार पडले. पत्रीका वाटप, मंडप, अत्तर-गुलाब, पेढे, जेवण इत्यादी व्यवस्था आमच्या वडीलांनी चोख ठेवली होती. त्यावेळी मी 8व्या वर्गात शिकत होतो. त्याचवर्षी श्री अशोक महाराज BAMS करण्यासाठी नागपुरला आले व 4 वर्ष ह्या आमच्या वडील बधुंचा आम्हाला अखंड सहवास लाभला. श्री महाराजांची नागपुरातील मुक्कामातील दिनचर्या खालीलप्रमाणे असे.

पहाटे 3.45 – 4 वाजता तात्यांबरोबर उठणे. त्यांच्याबरोबर तात्याही मलाही अभ्यासासाठी उठवीत. मुखमार्जन केल्यावर तात्या आमच्या तिघांसाठी चहा करीत. आंघोळ करून तात्या देवघरात गेल्यावर श्री महाराज अनेक अभंग स्त्रोत्रे वगैरे म्हणत दत्ताला प्रदक्षिणा घालत. दत्ताची आरती झाल्यावर तात्या घरातील देवांची पुजा वगैरे करून परत देवघरात एकादष्णी करीत. तोपर्यंत महाराज चहा घेऊन पेपरवाचन झाल्यावर आंघोळ करीत. त्यांचे धोतर, उपरणे धुण्यासाठी आमच्या भगिनिवाट बघत पण त्यांनी कधीही आपलेकपडे कोणालाही धुवू दिले नाहीत.

मी त्यांची आंघोळ बघत उभा असे. त्यांची भली मोठी शेंडी धुवून झटकुन गाठ बांधीत व मी कुतुहलाने त्यांचे निरीक्षण करीत असे. धोतर उपरणे धुतांना रोजचा संवाद खालील प्रमाणे होत असे. श्रीपाद, डॉ. राजेंद्रप्रसाद आपले राष्ट्रपती आहेत ते स्वतःचे धोतर स्वतःच धुतात, आपण तर त्यांच्यापेक्षा कितीतरी लहान आहोत. त्याच वर्षी 1961 साली श्री महाराजांना राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे कडून विद्यावाचस्पति हि पदवी मिळाली. परंतु महाराज दिल्लीला गेले नाहीत. तेव्हा पुणे मुक्कामी माननीय श्री दत्तो वामन पोतदारांचे हस्ते त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. 1961 पासुन माझा श्री बरोबर पत्र व्यवहार सुरू झाला तो श्री महाराजांचे पत्र लेखन सुरू असेपर्यंत सुरू होता.

1969 साली पुण्याला श्रींचा 60 वर्ष पुर्ण झाल्याचा समारंभ श्री वासुदेव निवासात श्री गुळवणी महाराजांनी घडवून आणला. त्याअगोदर श्री अजित व श्री सतिश (श्री वासुदेव महारांचे चिरंजीव) यांचा व्रतबंध ही आश्रमात झाला. भोजन व्यवस्था (विमलताई गरवारे हायस्कुल) तेव्हाचे भावे हायस्कूल येथे होती. S.P. College Hall मध्ये श्रींचा सत्कार समारंभ झाला. ह्याप्रसंगी श्री गुळवणी महारांजांचे हृदयस्पर्शी भाषणही झाले. त्यात त्यांनी सौ. आई साहेबांचाही कृतज्ञता पुर्वक उल्लेख केला. नुकताच त्यांचा स्वर्गवास झाला होता. श्री ढुंढीराजमहाराजही हा सोहळा कृतार्थतेने बघत होते. त्यावेळी पुणे, मुंबईतील सर्व वर्तमानपत्रांनी रकानेच्या रकाने भरून श्री महाराजांवर लेख लीहिले. श्री दीपलक्ष्मी मासीकानेही त्यावेळी श्रींवर विषेशांक काढला होता.

ह्याचवेळी आमचे ज्येष्ठ बंधु श्री अशोकरावांचा विवाह सोहळा पुण्यात पार पडला.

1970 साली बँक ऑफ इंडीयात नोकरी लागल्यावर कर्तव्य पालनावर श्री महाराजांनी अनेक पत्रांद्वारे वारंवार मार्गदर्शन केले. 1971 साली महाराज नागपुरला असतांना गॅसचे कनेक्शन घेतले. रबराची नळी स्वयंपाक करताना सोवळ्यात कशी चालेल असे आमच्या मातोश्री म्हणाल्यावर, अहो मामी, त्यात अग्नी असतो अग्नीला कशाचा विटाळ अशी समजूत काढली. स्वतः गॅस पेटवून प्रात्यक्षिक करून दाखविले व म्हणाले श्रीपाद हुशार आहे. मी म्हणालो, काय झाले, तर म्हणाले - लग्नाआधीच गॅस घेतला, उद्या कोणी म्हणायला नको की बायको आली म्हणून घेतला.

श्री महाराजना अनुग्रह देण्याची प्रार्थना केली असता तुमच्या लग्नाच्यावेळी उभयताना देऊ असे म्हणाले.

1974 साली आमचे लग्न ठरले. श्री महाराज आधीच उपस्थित झाले होते. एक दिवस सायंकाळी बँकेतुन आलो व सायकल स्टँण्डवर उभी केली. महाराज दत्ताला प्रदक्षिणा घालीत होते. मला बघितल्यावर जवळ येऊन म्हणाले. श्रीपाद आज तुमची मंडळी बघुन आलो. काय बोलावे हे सुचेना. मी म्हणालो महाराज, कशी वाटली, त्यावर म्हणाले हसत मुख आहे यात सर्व आले. 27 जानेवारी ला लग्न तिथी होती. 15 जानेवारीला श्री गुळवणीमहाराज गेल्याचे वर्तमान टेलीप्रिंटरवर आले व श्री नाना महाराजांचे शिष्य श्री वसंतराव साल्पेकरांनी ताबडतोब दत्त मंदीरात येऊन महाराजांना सांगीतले. श्री महाराज म्हणाले, श्री गुळवणी महाराज गेले, आता आम्हाला पुण्यात काही रस नाही. इकडे श्री गुळवणी महाराजांनी उतराधिकारी घोषित केल्यावर आमचे मोदीला श्री नारायण भंडार मध्ये पुण्यावरून महाराजांसाठी फोन येऊ लागले. श्री महाराज पुण्यात जाण्यास तयार होईनात. शेवटी श्री केरूर महाराजांना फोन करून म्हणाले की आम्ही सर्व मंडळी नागपुरला येऊन दत्त मंदीरात बैठक घेतो, तेथेच काय करावयाचे ते ठरवू. तेंव्हा आमचे वडीलांनी व इतरही काही जणानी श्री. महाराजांना पुण्यास जाण्यासाठी तयार केले व महाराष्ट्र एक्सप्रेस ने त्यांना पुण्याला रवाना केले.

त्या आधीची एक घटना सांगतो म्हणजे महाराजांचे आश्रमा विषयी काय मत होते ते लक्षात येईल. - श्री दत्त मंदीराचे कार्यवाह श्री x x x नावाचे गृहस्थ होते. ते तात्यांच्या मागे दत्त मंदीर सोडावे म्हणून मागे लागले होते. तात्या वहीवाटदारी ने हक्क सांगतील अशी त्यांना सतत भीती वाटत असे. महाराज तेथे असतानाच ते तात्यांना अपमानास्पद बोलले. ते गेल्यावर महाराज म्हणाले श्रीपाद तुमच्या मंदीरात एकच x x x आहेत आमच्या आश्रमात अनेक x x x आहेत.

1974 च्या जूलै, महीन्यात श्री महाराज जगन्नाथ गुरूजी व श्री गुळवणी महाराजांचे पुतणे अलाहाबादला श्री गुळवणी महाराजांच्या अस्थि विसर्जन करून नागपुरला आले व स्नान, संध्या व भोजन करून सायंकाळी 4-45 च्या नागपुर – पुणे बसने पुण्यास गेले.

पुण्यास गेल्यावर श्री महाराजांचे पत्र आले त्यात त्यांनी लीहीले की श्रावणात आम्ही देऊळगावराजा येथे प्रवचन सेवा करण्यासाठी येणार आहेत, तेंव्हा आपण उभयता तेथे आल्यास अनुग्रह देता येईल. त्याप्रमाणे आम्ही

उभयता आमचे मातोश्रीसह देऊळगावराजा येथे गेलो असताना पुण्याहवाचन, श्री दत्तुबाळास अभिषेक, श्री ढुंढीराज महाराजांची व श्री दत्तमहाराजांची पाद्यपुजा श्री बालाजीस पुरणपोळींचा नैवेद्य अशा रीतीने अनुग्रह संपन्न झाला. त्यावेळी श्री महाराज म्हणाले कि तुमच्या पुर्वजांचे अनुग्रह ही श्री लक्ष्मीव्यंकटेशाच्या चरणाजवळ झाले, त्याप्रमाणे तुमचा अनुग्रहही येथेच व्हावा अशी श्री बालाजींची इच्छा होती.

1961 च्या गुढीपाडव्याला आमचे येथे कुलदेवता श्री रेणुकेची स्थापना श्री महाराजांचे हस्ते झाली. आदले दिवशी 5,6 वेळेला सोनाराकडे चकरा मारून मुखवटा, डोळे वगैरे कसे असावेत याबद्ल सोनाराला मार्गदर्शन केले. फाल्गुन वद्य अमावास्येला आमचे घरा समोरील श्री बागडदेव यांचे निधन झाले असता त्यांचेकडे जाऊन श्री गुरूचरीत्रातील अनेक कथा प्रसंग सांगुन त्यांचे कुंटूंबीयांचे सांत्वन केले.

श्री महाराजांनी स्वतः पुजा व कथा सांगुन माझे हातुन श्री सत्यनारायण, सत्यविनायक व श्री सत्यदत्त करवुन घेतले आहेत.

1976 साली अश्वीनीचा व 1979 साली अभिजितचा जन्म झाला तेंव्हा तात्याच पुनः सुनबाईचे पोटी आले आहेत. असे त्यांचे पत्र आले. बारश्याच्या दिवशी पाळणा लीहीला व महाराजांना ते बोबडे बोल अर्पण केले. तेंव्हा तुमच्या ठिकाणी कवित्व शक्ति आहे, तिचा उपयोग प्रभुगुणवर्णनाकडे करावा असे महाराजांचे पत्र आले.

6 फेब्रुवारी 1978 ला श्री तात्यांचे निधन झाले. श्री महाराज असेपर्यंत त्यांनी आम्हाला आमचे पितृछत्र हरवल्याची जाणीव होऊ दिली नाही. वडील गेल्यावर आम्ही मंदीराचा ताबा सोडणार नाही, अशी विश्वस्त मंडळाला भिती होती. परंतु, मी गेल्यावर येथील सुतळीच्या तोड्यालाही हात लावू नये व आपल्या स्वतःच्या घरी रहावयास जावे. तु सगळयांचे केले आहेस, तुला काहीही कमी पडणार नाही असे तात्यांनी सांगीतले होते. त्याप्रमाणे आम्ही आमचा निर्णय विश्वस्तांना कळविला. त्याप्रमाणे श्री महाराजांनाही कळविले. त्यावर आपण घेतलेला निर्णय योग्य आहे व मंदीर सोडल्यावरही तेथील मुर्तीचे ध्यान सदैव डोळयापुढे ठेवावे असेश्री महाराजांचे पत्र आले.

1980 च्या जानेवारीत महाराज नागपुरला आले. दादर नागपुर एक्सप्रेस सकाळी 6.00 वाजता नागपुरला येत असे. स्टेशनवर गाडीतुन उतरल्याबरोबर महाराज म्हणाले, श्रीपाद आला आहे का, मी म्हणालो होय महाराज. महाराज म्हणाले, श्रीपाद तुमच्याकडे आईसाहेबांचे श्राध्द करावयाचे

आहे. त्याप्रमाणे आईसाहेबांचे श्राध्द संपन्न झाले. प्रसादाला बरीच मंडळी होती. खीर, बुंदीचे लाडू वगैरे पदार्थ केलेले होते. प्रत्येक सुवासीनीला श्री महाराजांनी 1 – 1 कलदार रूपया दिला. महाराज म्हणाले, श्रीपाद तुम्हाला बराच खर्च आला. मी म्हणालो, महाराज ती माझी ही आजी होती ना. त्या आधी डिसेंबर 1979 मध्ये मला 675 रू. ओवरटाईम मिळाला होता. सदगुरू प्रत्येक गोष्टीचा भार या ना त्या रूपाने उचलतात त्याचे हे प्रत्यंतर होते.

महाराजांच्या नागपुरात येणाच्याप्रसंगी आम्ही नवीन गादी, दुलई वगैरे घेत असु. व महाराज गेल्यावर प्रसाद रूपाने वापरत असु. महाराजांना बरेच दिवस पुरतील एवढे Post Card, lBall Pen, Refill व डायरी देण्याचा नेम सुरू ठेवला होता. पुढील खेपेस महाराज म्हणत श्रीपाद तुम्ही दिलेला पेन खराब झाला व मी लगेच नवीन पेनची व्यवस्था करीत असे.

1978 ला तात्या गेल्यावर ही महाराजांची पहीलीच भेट होती. त्यावेळेस आमच्या व महाराजांच्या मनात अतिशय गहीवर दाटून आला होता.

1980 मध्ये महाराज पुण्यात गेल्यावर प्रमोशनचा इंटरव्ह्यु झाला. तिघांची इंटरव्ह्यु कमिटी होती. 15 मिनिटे इंटरव्ह्यु सुरू होता. प्रत्येक प्रश्न विचारल्यावर मागील भिंतीवर श्री महाराजांची हास्यमुद्रा दिसायची व बरोबर, उत्तर दिले जायचे. 15 मिनिटे हा प्रकार सुरू होता. प्रमोशन मिळाले हे सांगावयास नकोच.

1980 साली पुण्यात असतांना महाराजांचे बाबाराव भिडे वकील व पोलीस कमीश्नर झाले होते व त्यांच्या भाडेक-याबद्दल लेखी तक्रार मागत होते. महाराजांनी त्यांना स्पष्ट शब्दात नकार दिला. तात्या गेल्यावर मी रोज गुरु चरीत्राची अवतरणीका वाचत असे. महाराजांनी तसे न करता रोज 200 ओव्या वाचून 20-21 अध्याय व 30-31-32 हे अध्याय सलग वाचल्यास महीन्यात गुरूचरीत्राचे पारायण होईल असे सांगीतले. रोज कमी वाचल्यास सुटीचे दिवशी जास्त वाचन करावे असेही कळविले.

1981 साली महाराजांचा ~~60~~ 70 वा वर्धापन समारंभ साजरा झाला. त्यावेळी मी नागभीड येथे होतो. श्री कृपेने, सुट्टी आरक्षण वगैरेची व्यवस्था होऊन पुण्यास पोचलो. समारोहाचे अध्यक्ष स्थानी श्री. ढुंढामहाराज देगलुरकर होते. एकनाथाचे आख्यान लावून श्री एकनाथ महाराज हे दत्तमहाराजांप्रमाणे होते हे ते सप्रमाण पटवून देत होते.समारोपाचे वेळी श्री महाराज म्हणाले सत्पुरूष हे श्री. ढुंढामहाराजांप्रमाणे असतात आपले सगळे सदगुण माझ्यावर टाकुन ते मोकळे झालेत. समारोपाचा कार्यक्रम सोडून जावयाची इच्छा होत नव्हती. श्री महाराजांचे गुरूबंधु धारवाड येथील श्री भालचंद्र शास्त्री उप्पेनवेटगीरींचे महाराजांवरील व्याख्यान अपुर्व असे होते. समारंभ

आटोपल्यावर जड़ अंतःकरणाने पुणे स्टेशनवर आलो. परतीचे आरक्षण नव्हते. तुफानगर्दी तिकीट खिडकीवर होती. गाडी कुठल्याही क्षणी फलाटावर येणार होती. माझा नंबर अंदाजे 110 च्या जवळपास असावा महाराजांचे समरण सुरू होते. तेवढ्यात एक सदगृहस्थ जवळ आले व तुम्हाला नागपुरचे तिकीट हवे का असे विचारू लागले. होय म्हटल्यावर त्याने माझ्या हातात तिकीट ठेवले. छापील किंमत 42.50 खोडून शाईने 46.50 लीहीले होते. तुम्हाला वाटेल तेवढे पैसे द्या असेही तो म्हणाला 42.50 रू. दिल्यावर तो निघुन गेला. चौकशी अंती 46.50 रू. तिकीट असल्याचे कळले. तेंव्हा एका हमालाला 4 रू. दिले व सामान गाडीत ठेवण्याय सांगीतले. उन्हाळ्याची गर्दी असुनही व्यवथीत जागा मिळून बिना त्रासाने प्रवास झाला. हा प्रकार महाराजांना कळविला व म्हंटले महाराज आपणच त्या व्यक्तिच्या रूपाने आला होता.

1983 साली डिसेंबर महीन्यात श्री महाराजांचा भागवत सप्ताह झाला. आम्ही उभयतांनी कंकण धरले होते. स्टेशनवर उतरल्यावर महाराज म्हणाले श्रीपाद काल सकाळी मांटुंग्याला तात्या आमच्या स्वप्नात आले होते व म्हणाले महाराज श्रीपादने सर्व तयारी केली आहे, मी तुम्हाला न्यायला आलो आहे. मी म्हणालो चला, तर ते म्हणाले आम्ही पुढे होतो. तुम्ही मागाहुन या. तसेच त्यांनी घातलेल्या पोशाखाचे वर्णन करून सांगीतले. सप्ताहासाठी भागवत सेवा समिति स्थापन केली होती. गोकर्णाच्या दिवशी सरसंघचालक पू. बाळासाहेब देवरस आले होते. त्यांनी काही शब्द धर्माचार्यांबद्दल उदगारले होते. ब-याच जणांना ते आवडले नाही. श्री महाराजांनी सातही दिवस नाव न घेता पुराणाचे शेवटी त्याचे खंडन केले. मला डिसेंबर महीन्याचे closing असल्याने 5 दिवसांची सुट्टी मिळाली. त्यावेळेस दत्तजयंती सप्ताहात रोज गुरूचरीत्र संपल्यावर दत्तास हात जोडून रजा 7 दिवस मिळावी म्हणून विनवणी करीत होतो. दत्त जयंतीचे दिवशी बैंकेसमोर कार थांबली व Zonal Manager आले. मी माझ्या क्रिश्चन कॅशीयरला सांगीतले की, महाराजांनी त्यांना माझी रजा मंजूर करावयासाठी पाठविले आहे. सर्व विचारपूस झाल्यावर त्यांनी विचारले की काही अडचण आहे का. मी त्यांना सप्ताहाविषयी सांगीतले व म्हणालो मला 5 दिवसाची रजा मिळाली आहे. तेंव्हा ते म्हणाले की सातव्या दिवशी बैंक बंद होईपर्यंत या व Balance sheet वर सह्या करा. सुरूवातीला पुण्याहवाचन झाल्यावर महाराज सौ. ला म्हणाले की अश्विनीचे लग्न करायचे ना. सप्ताहाची तशीच तयारी करावयाची असते. रोज संध्याकाळी महाराज कॉफी घेत असत. धाकटा अमित कुठेही असला तरी धावत येऊन त्यांच्या बाजूला बसत असे. महाराज विचारीत अमित कॉफी घेता का. अमित म्हणायचा नको. थोडीशी कॉफी शिल्लक ठेऊन महाराज त्याला द्यायचे. ती

कॉफी पिऊन तो धुम ठोकीत असे. महाराज म्हणत नाही म्हणता, मग आता कशी घेतली. पुण्यात मुक्काम महाराजांच्या घरी होत असे. महारांजाच्या जवळ बसण्यास संकोच वाटत असे. मनात विचार येई की महाराजांसाठी दिवाण घ्यावा. नागपुर मुक्कामी महाराज असतांना श्री गुळवणी महारांजांचे अनुग्रहित श्री मुरार तेजा चव्हाण दर्शनास आले असता महाराजांच्या नकळत त्यांच्याजवळ पैसे दिले व सांगीतले की हे पैसे अजीत जवळ देऊन महाराज पुण्यात येण्याआधी दिवाण घ्यावा. पुण्याला गेल्यावर महाराजांचे पत्र आले की, आपण गुप्तदान करता असे समजले. परंतु आपण प्रपंचात आहात तेंव्हा पैशाचा विनियोग योग्यप्रकारे करावा.

सप्ताह – झाल्यावर समितीजवळ रू.2000/- शिल्लक राहीले. सर्व सदस्यांनी महाराजांच्या राहण्याचा खर्च म्हणुन मी ते पैसे ठेवावे असे सुचविले, तेंव्हा मी नकार दिला व आमचे कौटुंबीक संबंध असल्याचे सांगीतले, तेंव्हा हे पैसे महाराजांना द्यावे असे सुचविले. महाराजांनी ते पैसे मला ठेवण्यास सांगीतले व पुण्यात गेल्यावर याचा विनीयोग कसा करावा हे कळविन म्हणाले. पुण्यात गेल्यावर पत्र आले की गुरूपेक्षा गुरूस्थानाचे महत्व जास्त असते सबब हे पैसे वामन निवासासाठी पाठवावे.

महाराज म्हणाले होते, की, श्रीपाद आम्ही वामन निवासाठी भागवत सप्ताह करीत असतो. आम्ही मंडळीना सांगीतले की कपड़ा-लत्यावर तुमचा अधिकार, पैशावर वामननिवासाचा व सुवर्ण आम्ही पिताजींच्या श्राध्दाप्रसंगी देणार.

रेणुका निवासाच्या नंतरच्या बांधकामाबद्दल म्हणाले की श्रीपाद नागले नावाचे इंजिनियर हे बांधकाम करीत होते, त्यांना आम्ही सांगीतले की आमच्याकडे पैसे नाहीत व फक्त सरकारकडून पेंशन मिळते तेच आमचे उत्पन्न. बांधकाम झाल्यावर आम्ही सोने वगैरे विकुन त्यांचे पैसे फेडले.

1984 जानेवारीत नागपुरहून निघताना म्हणाले आम्ही मामींना माहेरपणासाठी घेऊन जातो. सकाळी 6 वाजतां धनुर्मास केला व पुरणाचे जेवण होते. जाईपर्यंत महाराजांनी याबद्दल वारंवार कौतुकोदगार काढले.

1984 च्या एप्रिल / मे महीन्यात सकाळी स्वप्न पडले. स्वप्नात एका अनोळखी प्रदेशात बसने प्रवास करताना दिसले. एका मंदीराचा उंच कळस, श्री महाराज व रघुनाथराव नवीन धोतर व उपरणे नेसलेले दिसले. रघुनाथराव म्हणतात, श्रीपाद महाराज येथेच आहेत व महाराज, श्रीपाद आला. सकाळी उठून सौ. ला हे स्वप्न सांगीतले व म्हणालो, काहीही स्वप्न पडतात. कुठला अनोळखी प्रदेशातला प्रवास, कुठले देऊळ, पण काही असो, महाराजांचे दर्शन झाले. काही दिवसांनी आम्ही मुंबईला गेलो. नंतर मी व श्री माधवराव गाणगापुराहुन वैरागला सौ. सुमनताईंचे घरी गेलो. तेथे श्री महाराज बार्शी येथे

असल्याचे समजले. मी व माधवराव बार्शीला गेलो असताना स्वप्नातील अनोळखी प्रदेश म्हणजे बार्शी असल्याचे कळले. देवळाचा कळस म्हणजे भगवंत मंदीराचा कळस होता व स्वप्नात पाहीलेले महाराज, रघुनाथराव व संपुर्ण संवाद जशाच्या तसा घडला.

तात्या गेल्यावर जेव्हा, जेव्हा महाराज नागपुरात येत त्या त्या वेळेस म्हणत, श्रीपाद, तुमच्याकडे मुक्काम केल्याने आम्हास तात्यांच्या ऋणातुन थोडे मुक्त झाल्यासारखे वाटते.

माझ्या आयुष्यातील अनेक महत्वाचे निर्णय महाराजांनी व आता प.प. सौ. ताईमहाराजांनी घेतलेले आहेत. त्यामुळेच माझ्या जीवनात अर्थ व आनंद मी भोगीत आहे. ही माझी शत जन्माची पुण्याईच फळाला आली आहे अशी माझी खात्री आहे.

आपल्या वडीलांनी ठेवलेल्या संपत्तीबद्दल जेंव्हा चर्चा होते, तेंव्हा श्री. तात्या व सौ. मामी यांचे पोटी जन्म घेतल्याचा अभिमान वाटतो. तसेच श्री दत्ताची उपासना व वारसाने प्राप्त झालेली श्री कविश्वरांची कृपा हीच माझ्या वडीलांकडून प्राप्त झालेली अनमोल संपत्ती आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे.

सर्वसंग परित्यागकरून श्री महाराजां जवळ राहून सेवा करण्याची इच्छा प्रदर्शीत केल्यावर श्री.नीं खालील त्रिसुत्री सांगीतली.

(1) आपण प्रपंचात आहात, चांगला प्रपंच करणे हीच आमची सेवा आहे.

(2) आपली नोकरी इमाने-इतबारे करणे ही आमची सेवा आहे व

(3) आपण आमचे स्मरण करता तेंव्हा आम्ही आपल्याबरोबरच असतो.

1981 च्या श्री दत्त जयंतीला श्री महाराजांची मला शक्तीपात दिक्षा दिली.

1984 साली प्रथम श्री रेणुका निवासात भगवति सौ. ताई महाराजांचे दर्शन झाले. तेंव्हा श्री महाराजांनी त्या 'श्री रेणुका' आहेत त्यांचे दर्शन घेत जावे असे सांगीतले.

नागपुर मुक्कामात रोज रात्री 9.30 ते 1.30 वाजेपर्यंत श्री महाराज अनेक विषयावर बोलत असत. आम्ही महाराजांना आपण विश्रांती घ्या, असे म्हणत असू व महाराज म्हणत श्रीपाद तुम्ही झोपा उद्या तुम्हाला बँक आहे. ते व आम्ही दोघेही झोपत नसु.

1998 साली चि.सौ. रेणुकाच्या लग्नप्रसंगी पुण्यात सकाळी 5 ला पाहोचलो. सौ. आईसाहेबांची प्रकृति ठीक नव्हती, घरी लग्नाचे पाहुणे वगैरे असतील, म्हणुन आम्ही पुण्यात, प्रथमच हॉटेल मध्ये मुक्काम केला, स्नान वगैरे आटोपून श्री रेणुका निवासात गेलो असता सौ. सुमनताई ,अजीत वगैरेंनी सामान कुठे आहे असे विचारले असता, हॉटेलमध्ये उतरल्याचे सांगीतले व

ताबडतोब हॉटेल सोडून परत रेणुकानिवासात सामान घेऊन आलो. संध्याकाळी महाराज म्हणाले, यावेळी तुम्ही दुसरीकडे उतरलात असे ऐकले. मी म्हणालो होय महाराज, पण परत सामान घेऊन आलो. संध्याकाळी 6 ते 9 असे सतत तीन तास महाराज सतत तात्यांच्या प्रामाणीकपणाबद्दल अनेक गोष्टी, नागपुरातील त्यांच्या आठवणी याबाबत बोलत होते. त्यांच्या बोलण्यातुन आमच्या पिताजींच्या महानतेचे अनेकपैलू कळून आले व अशा सत्वशील पुरूषांच्या पोटी जन्म घेतल्याचा अभिमान दुणावला. यावेळी श्री प्रसाद पाटणकर, विद्याधर फडके व स्वयंपाक घरात विद्याधरच्या आई एवढेच उपस्थित होते. त्याचवेळी अश्विनीचा फोटो काढून वर संशोधनाला सुरूवात कर असे सांगीतले.

महाराजांच्या एका शिष्य परिवाराकडे आमच्या बँकेची कर्ज थकबाकी होती. कर्जखाते माझेकडे असल्यामुळे महाराजांनी त्या खात्याची माहीती घेतली. प्रकरण न्यायालयात जाण्याची शक्यता असल्याचे समजताच, महाराजांनी माझेकडे काही रक्कम त्या खात्यात भरण्यासाठी दिली व या गोष्टीची माहीती त्या कुटूंबाला न देण्याची सुचनाही केली. केवढे हे औदार्य.

श्री दत्त मंदीरात रोज दुपारी 2 ते 3 दिगंबराची धुन असायची. सर्व भगिनिमंडळाने निर्णय घेऊन त्या ऐवजी गुरु दत्तात्रय अवधुता, जनार्दन स्वामी एकनाथा ही धुन सुरू केली. पुढल्या खेपेस महाराजांनी विचारले, दिगंबराचे भजन का बंद केले. नंतर महाराजांनी त्यांना *दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा* या मंत्राचे महत्व विषद करून सांगीतले व परत दिगंबराचे भजन सुरू करविले.

शनिवार, दिनांक 9 जानेवारी 1999 साली मी हिंगणघाट शाखेत व्यवस्थापक असताना, सकाळी 3 वाजता स्वप्न पडले. श्री महाराजांनी माझे बोटात सोन्याची अंगठी घतली व मला जवळ घेऊन खुप रडले. जाग आल्यावर हातपाय धुवून झोपलो असताना 3.30 परत त्याच स्वप्नाने जागा झालो. मन अस्वस्थ झाले होते. 10 तारखेला रविवारी संध्याकाळी भावेंडाबरोबर या विषयी संध्याकाळी चर्चा सुरू असतांना, अजीतचा फोन आला व आईसाहेब गेल्याचे कळले. रजा घेऊन 3,4 दिवसांनी पुण्याला गेलो, तेंव्हा महाराज म्हणाले, श्रीपाद तुमच्याकाकू गेल्या आता आम्ही मोकळे झालो. त्यावेळी श्री महाराजांच्या चेहे-यावर जे अलौकीक तेज होते में माझ्या आयुष्यात मी कधीही बघीतले नाही.

25 फेब्रुवारी 1999 सौ. चा वाढविदस, सकाळी तिच्या स्वप्नात श्री अशोक महाराज आले व म्हणाले वहीनी, श्रीपादला घेऊन लवकर या हिमालयावरचा बर्फ वितळतो आहे. सौ. ने उठल्यावर हे स्वप्न सांगीतले. दिनांक 1 मार्च रोजी सकाळी अजीतचा फोन आला. आपण पोहोचू शकत नसल्याबद्दल वाईट वाटले. कारण विमानसेवा नसल्याने पुण्याला पोचणे अशक्य होते. थोड्यावेळाने अजीतचा पुन: फोन आला व उद्या नेणार असे सांगीतले. लगेच पुण्याला सहकुटूंब रवाना झालो. श्री रेणुका निवासात पोचल्यावर खरेच, सर्व आर्तांचा महामेरु हिमालय, वितळणा-या बर्फावर शांतपणे पहुडला होता.

अजुनही या आठवणी महाराज आपल्या बरोबर सतत आहेत, याची अनुभुति देतात व मनाला उभारी येते.

श्रीपाद तेलंग

|| श्री गुरूदेव दत्त ||

दत्तात्रेया सदगुरूनाथा नमितो तुज आतां
हात जोडूनी करीत विनवणी प्रसन्न हो आता || धृ ||

कुर्म दृष्टिने पाही मजला
बुडलो भव सागरी
प्रपंच माया नाही सुटली
धाव पाव माऊली || 1 ||

वंश परंपरी कवीश्वरांची
कृपा आम्हाँ लाभली
वक्रतुंड श्री ढुंढीराज अन
दत्त भक्ती जडली || 2 ||

श्रीपाद हा गोपाळसुत
शरण तुम्हा आला
सन्मार्गाला लावी त्याला
आर्शिवच देई || 3 ||

दत्तात्रेया सदगुरूनाथा नमितो तुज आतां
हात जोडूनी करीत विनवणी प्रसन्न हो आता ||

## श्री गणेशदत्तगुरूभ्योंनम:

बाळा जो जो रे श्रीदत्ता ।
अत्री ऋषींच्या पुत्रा, बाळा जो जो रे ।

कुलभुषण अनसुयानंदना ।
बाळा जो जो रे ।

साध्वी पतिव्रता, अनुसया, आहे ही तव माता
पाजवी अमृता, जगत्पित्या ब्रम्हा विष्णु शिवा
बाळा जो जो रे । ॥ 2 ॥

बघण्या सत्व आले त्रयमुर्ती
जगत्रयी जिची किर्ती, माता अनसुया
तपोबळे केली त्यांची बाळे
बाळा जो जो रे । ॥ 3 ॥

बालक मी तुमचा घ्या सेवा
आशीर्वच तो द्यावा, सेवा घडो सदा
श्रीदत्ता शरण तुला भगवतंता
बाळा जो जो रे । ॥ 4 ॥

सेवा पित्याने तव केली
मुर्ति मनी बसविली, राहो सदा तशी
ही विनंती, सदैव रहावे चित्ती
बाळा जो जो रे । ॥ 5 ॥

श्रीपाद, पाया आलासे
आश्रय द्यावा त्याते
बाळा जो जो रे कुल भुषणा
अनुसयानंदना बाळा जो जो रे ।

<u>श्री गणेशदत्तगुरूभ्योंनम:</u>

श्रीदत्ताश्रम हे माहेर
सर्व सुखाचे आगर
ताई माझी माऊली
करी मायेची सावली ।

भक्त येती वारंवार
ह्दयी करूणा अपरंपार
करण्या भक्तांचा उद्धार
माय माऊली अवतरली ।

जगती नाते अपरंपार
परी न ये आईची सर
पैलतीरी नेई पार
भवसागरी नौका भक्तांची

भक्त जमती अपार
सोहळे होती वारंवार
मन:शांति मिळे अपार
पदी माऊली ताईच्या

कृपा आहेच दिनावर
वृध्दी करी त्यात अपार
चरणी श्रीपाद ठेवी शीर
भक्तीत वृध्दी होऊ द्यावी

श्री गणेशदत्तगुरूभ्योंनमः

(चाल – बोला जगदंबा बोला )

वंदू गुरूपादुकेला ।
जाऊ चला जालन्याला ।। धृ ।।

दत्ताश्रम हे मम माहेर
भेटीसाठी, ही हुरहुर
शांति लाभे जीवनाला
जाऊ चला जालन्याला ।। 1 ।।

भगवति ताई करीती निवास
पुरविति आमुच्या मनीची आस
वंदु गुरु माऊलीला
जाऊ चला जालन्याला ।। 2 ।।

दत्ताश्रम भक्ता माहेर
प्रेमाश्रुंचा येई पुर
होई भक्तांचा उद्धार
जाऊ चला जालन्याला ।। 3 ।।

कृपा असु या दासांवरती
स्वीकारावी अमुची भक्ती
देई संतसंगतीला
जाऊ चला जालन्याला ।। 4 ।।

श्रीपाद हा शरण तुम्हाला
लाभो तुमची सदैव सेवा
ठेवा कर शिरावर
जाऊ चला जालन्याला ।। 5 ।।

attachment